# पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड मास्टर (पोलीस निरीक्षक) या पदावर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याकरिता विहीत नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहेत

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३,दि.१७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीस अनुसरून शासकीय / निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेले परंतु काम करण्यास सक्षम असलेल्या अधिकारी यांना पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवर **बॅन्ड मास्टर (पोलीस निरीक्षक)** या पदावर करार पध्दतीने नियुक्ती करणे आहे.

उमेदावाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात ........................ येथून .......... या पदावरून निवृत असे नमूद करून दि. १५/०३/२०२३ पर्यंत सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यलिय, डी.एन.रोड, मुंबई–४०० ००१ (**लक्षवेध – सह पोलीस आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई** ) या पत्त्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. यानंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे अर्जदार यांनी जोडावेत.

<u>टिप, सूचना व अटी :–</u>

१. <u>वयोमार्यादा</u> – करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत कार्यरत राहू शकतील.
२. उपरोक्त पदावर पात्र उमेदवाराची नेमणूक मुलाखतीद्वारे करण्यात येईल. सदर मुलाखतीचा दिनांक स्वतंत्रपणे पात्र उमेदवारास कळविण्यात येईल.
३. उपरोक्त पदावरील नेमणूकीस पात्र ठरलेल्या उमेदवारास वैद्यकीय चाचणी बंधनकारक राहणार आहे. वैद्यकीय चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवाराचीच नेमणूक करण्यात येईल.
४. उपरोक्त निवड प्रक्रीया महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३,दि. १७/१२/२०१६ अनुसार राबविण्यात येईल.
५. नियुक्त उमेदावारास एक विशेष बाब म्हणून दरमहा (सेवानिवृत्तीपूर्वी मिळणारे मूळ वेतन + महागाई भत्ता)–(अंशराशीकरणापूर्वीचे निवृत्तीवेतन + महागाई भत्ता) इतकी रक्कम परिश्रमिक म्हणून अदा करण्यात येईल.

<u>अर्हता व अनुभव</u>

१. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.
२. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
३. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**QUALIFICATIONS :-**

**(A)**Candidate must be ....

1) An associate of the Royal Academy of Music, the Royal college of Music or the Trinity college of Music, London
2) Licentiate Military Music Education (LMME) at Sena Shiksha Core Traing Collegae & Center, Panchamadhi, Madhya Pradesh
3) Possess at least five years experience in a service band & be thoroughly acquinted with Military Band instrument & be able to arrange Music for Military Bands **AND**
4) Be an able Conductor & disciplinarian with knowledge of military parade ground procedure **AND**
5) Have a minimum height of 165 cms. & a minimum chest of 84 cms(Defalted)
6) As per Government letter, Home Department No. PSB-3200/C.R.392/Pol-5A, Dated 16/07/2003 the certificate issued by the The Army Educational Corps, Training college & centre, Panchmadhi, M.P is also acceptable.

The condition of technical qualifications may be relaxed in the case of candidates who have adequate previous experience as conductors of Service Bands & are capable of carrying out duties of Band Masters.

**(B)** As per G.R.General Administration Department No.Training-20001/39,dt.19/03/2003 it is necessary that the candidate should acquire following certificate regarding Computer knowledge within two years from the date of appointment failing which his / her services will be terminated.

A) Passing certificate for any one of the C.C.C or O level or A level or B level or C level authorized exam of DOEACC Society OR

B) Passing certificate of authorized MSCIT exam of Maharashtra State , Higher & Technical Education Board, Mumbai.

**मासिक पारिश्रमिक व भत्ते :—**

(१) मासिक पारिश्रमिक —

(क) शासकीय / निमशासकीय सेवा — सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची (विहीत कार्यपध्दतीचे पालन करून) करारपध्दतीने नेमणूक करताना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ०३ वर्षे) कायम राहील.

**निवृत्ती वेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा :—**

ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणीत करून त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

(२) भत्ते — उक्त तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ, बाबी विचारात घेवून निश्चित करण्यात यावी.

(३) प्रवासभत्ता व दैनिक भत्ता — करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळेच्या वेतनमानास अनुसरून प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

(४) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अशा व्यक्तीना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

(५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या पारिश्रमिकापोटी व भत्त्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या कार्यालयीन खर्च या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

**इतर अटी व शर्ती :—**

(१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळवण्याचा अधिकार / हक्क नसेल.

(२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

(३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती. सोपवलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

(४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

(५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

(६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील.

३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

४. करार पध्दतीने नियुक्तीने करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

५. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त / स्वेच्छ सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येवू नये.

६. हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालये, शासकीय उपक्रम, संविधिक संस्था, मंडळे / महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू राहील.

उपरोक्त निवड प्रक्रीया राबविताना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ मधील नमूद अटींचे व सूचनेचे पालन करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयात खालीलप्रमाणे

---

(अ) निवडप्रक्रिया व नियुक्ती –

१ **नामिकासूची (Panel)** – करार पध्दतीने ''विवक्षित कामांसाठी'' नेमणुका करताना पादर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहित पध्दतीने जाहिरात देवून ''विवक्षित कामांसाठी'' पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहीरातीमध्ये नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरूप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक (शासन निर्णयातील ड(१)(क) च्या अनुषंगाने) यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त उमेदवाराची निवड करून नामिकासूची (च्ंदमस).नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी.

२. नामिकासूचीची **(Panel) वैधता** – सदर नामिकासूचीतील व्यक्तीमधूनच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ०३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३. एमपॅनलमेंटचा **कालावधी** – विवक्षित कामाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेवून ते काम पूर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित करावा.

४. **बंधपत्र / हमीपत्र** – नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील या आशयाचे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात / हमीपत्रात, करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

५. **नियुक्ती आदेश** – नामिकासूचीतील व्यक्तीकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशांमध्ये ''एमपॅनलमेंटचा विषय'' विवक्षित स्वरूपाचे काम आणि ते काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करून सक्षम प्राधिकारी यांनी नियुक्ती आदेश काढावेत.

६. **करार पध्दतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तिंची संख्या** – करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील / आस्थापनेवरील एकूण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १०: इतके अधिकाऱ्यांना करार पध्दतीने नियुक्ती देता येईल. करार पध्दतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरूप, आकस्मिकता, सार्वजनिक हित इ.बाबी विचारात घेण्यात याव्यात.

७. **करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा** – सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८. **वर्यामर्यादा** – करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिंच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या / प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

९. सक्षम प्राधिकारी —

(१) गट — अ (ग्रेड पे रू.७६००/— किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास असतील.

(२) गट — अ (ग्रेड पे रू.७६००/— पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९(२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.

(३) गट—ब (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याचे अधिकार प्रादेशिक प्रमुखांना (Regional Head) असतील.

१०. गट—क व गट—ड संवर्गातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येवू नये.

# अर्जाचा नमूना

'गट-अ' * पदाकरिता अर्ज

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुस-या फोटो चे मागील बाजूस नाव लिहून लिफाफ्यात जोडावा.

कार्यालयीन उपयोगासाठी

**1. अर्ज क्रमांक :** ☐☐☐☐☐☐☐

**2. अर्ज स्विकारल्याचा दिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

**3. अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) :** ____________

---

**सूचना :** अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.
\# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.
* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

1. **अर्जदाराचे संपूर्ण नांव :** आडनांव नांव वडीलांचे / पतीचे नांव
   मराठीत : ____________________
   \# इंग्रजीत :
   ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐
2. **पत्रव्यवहाराचा पत्ता :** ____________________
   ____________________
   तालुका :__________ जिल्हा :__________ पीन कोड : ☐☐☐ ☐☐☐
3. **कायमचा पत्ता :**
   ____________________
   तालुका :__________ जिल्हा :__________ पीन कोड : ☐☐☐ ☐☐☐
4. **दूरध्वनी क्रमांक** - लॅन्डलाईन __________ मोबाईल क्रमांक :__________

4A. **ई-मेल :** ____________________

5. **जन्मदिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्म स्थळ :__________
6. दिनांक ०१/०३/२०२३ रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
   दिवस महिना वर्ष
7. लिंग : पुरूष ☐ / महिला ☐
8. धर्म : __________ जात : __________

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

**10. शैक्षणिक अर्हता :**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/ महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १०वी) अथवा जूनी ११ वी परिक्षा. | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १२ वी.) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |
| ५. इतर शैक्षणिक गुणवत्ता | | | | | |

11. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? : होय ☐ / नाही ☐

12-अ अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात/ बध्द करण्यात/ दंड करण्यात/ सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय ? होय ☐ नाही ☐

12-ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय ☐ नाही ☐

(13-अ किंवा 13-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यीदीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.

** ** **

**अर्जासोबत जोडावयाची सांक्षाकीत कागदपत्रे :-**

१. शासन मान्य ओळखपत्र
२. जन्मतारीख बाबत पुरावा
३. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र.
४. सेवानिवृत्ती आदेश

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

मी श्री./सौ./कु.__________________________________________ याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

**सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.**